**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय**
बंगला क्रमांक 10/2, स्टार्की टाऊन, सदर, मंगळवारी बाजाराचे जवळ
**नागपूर**-440001 **दुरध्वनी क्र.** 0712-2978844, **फॅक्स क्र.** 0712-2553018
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

**अत्यंतमहत्वाचे**
**ई-मेल / स्पीडपोष्ट**

विषय :- निसर्ग पर्यटनाचा आराखडा तयार करणेकरिता मार्गदर्शक सुचना.

**क्रमांक**:- कक्ष-2/(यो.)/ 723 /17-18
नागपूर-440001 दिनांक 20 /01/2018

प्रति,

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
2) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-2/METDB/02 दि.05/04/2017

वरील संदर्भिय पत्रान्वये निसर्ग पर्यटनाच्या स्थळांची निवड करण्याकरीता मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आल्या आहे. त्याअनुषंगाने निसर्ग पर्यटन स्थळाचे आराखडे तयार करण्याकरीता मार्गदर्शक सुचना जारी करण्यात येत आहे. तरी सदर सुचनानुसारच निसर्ग पर्यटन स्थळाचे आराखडे तयार करण्यात यावे ही विनंती.

**सहपत्र:- वरीलप्रमाणे**

**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ**
**नागपूर**

# निसर्ग पर्यटनाचा आराखडा तयार करणेकरिता मार्गदर्शक सुचना

1. निसर्ग पर्यटन हे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणारे असावे तसेच त्यामुळे स्थानीक लोकांचा शाश्वत विकास होण्यास मदत व्हावी.
2. निसर्ग पर्यटन आराखडा 3 ते 5 वर्षाकरीता असावा. आराखडा स्थानीक, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तरापैकी कोणत्या स्तरावरील आहे ते नमूद करावे.
3. स्थळांची निवड करतांना निसर्ग पर्यटन स्थळांचे विकासामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होणे, निसर्ग शिक्षणाचा प्रसार होणे व स्थानिकांना रोजगार मिळणे अपेक्षित आहे. या तिन्ही निकषवर ख-या उतरणा-या स्थळांची निवड करावी तसेच निसर्ग पर्यटन स्थळाचे क्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती / परिसर विकास समितीला सदर क्षेत्राची देखभाल करण्याची जबाबदारी देण्यात यावी व निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास अशा रितीने व्हावा कि, जेणेकरुन त्याचा देखभाल खर्च प्रवेश फी व इतर राजस्वातुन पूर्ण करता यावा.
4. प्रत्येक मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांनी आराखड्यामध्ये प्राथमिक माहिती दिल्यानंतर एक तज्ञांच्या मदतीने Concept Note तयार करावी.
5. प्रत्येक आराखड्यात DPR मध्ये वास्तूशास्त्रज्ञाकडून तयार केलेले अवस्था-1 चे अंदाजपत्रकाचा समावेश असावा. तसेच आराखड्यासोबत जोडावयाच्या परिपूर्ण नकाशा ज्यात क्षेत्र, कामाची ठिकाणे दाखवावी.
6. आराखड्यात बालोद्यान खेळणी, निवासस्थान बांधकाम / दुरुस्ती, वाहन दुरुस्ती / देखभाल, ड्रायव्हर व मदतनीस मजुरी, कार्यालयीन साहित्य खरेदी, वड, पिंपळ, करंज, निम, रेन्डी, स्पॅथोडीच, मेलींगटोनीया, अमलतास, चिंच व शोभीवंत उंच वृक्षांची संरक्षीत क्षेत्रात drip irrigation लागवड करणे या कामाकरीता निधीमंजूर करण्यात येणार नाही.
7. निसर्ग पर्यटन क्षेत्रात स्थानीकांचा रोजगार वाढविणारे, निसर्ग शिक्षणाचा प्रसार होणारे व पर्यटकांना निसर्ग पर्यटनासाठी आवश्यक सुविधा अंतर्भूत करुन प्रस्ताव सादर करावा.
8. प्रकल्प कालावधी पूर्ण झाल्यावर तो Self sustainable व्हावा यासाठी प्रयत्न करावे. स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा पर्यावरण विकास समितीला प्रकल्पाची जबाबदारी देऊन त्यांना रोजगार मिळण्याकरीता व महसूल प्राप्त होण्याकरीता आवश्यक ती व्यवस्था करुन द्यावी. प्राप्त महसूलातुन देखभाल खर्च भागविण्यात येवून प्रकल्प Self Sustainable होण्यास प्रयत्न करावे.
9. स्थानिक कला व संस्कृती (Art & Culture) यांना प्रोत्साहन देण्या-या बाबींचा प्रस्तावात अंतर्भाव असावा. उदा. Souvenir shop, कला व संस्कृती यांचे प्रदर्शन भरविणे व कार्यक्रम आयोजीत करणे इत्यादी.
10. प्रकल्पामध्ये लागणा-या ऊर्जे करीता फक्त अपारंपारीक ऊर्जा स्त्रोताचा वापर करावा. तसेच प्रत्येक बांधकामांवर वॉटर हार्वेस्टींग स्ट्रक्चर घेण्यात यावे.
11. कुंपनाची कामे करतांना (शक्य तो) जैविक कुंपन घेण्यात यावे.

12. पर्यटकांना शैचालय, छोटी दुकाने खाद्य पदार्थाची दुकाने, विश्राम करणेकरीता तात्पूरते मंडप, वाहनतळाकरीता जागा इ. सवलती देण्यात याव्यात.

13. प्रकल्प क्षेत्रात बांधकामे किंवा इतर तत्सम कामे घेणे आवश्यक असल्यास प्रकल्प क्षेत्रातील झाडे झाडेझुडपे नसलेल्या व गावाला / शहराला लागुन असलेल्या क्षेत्रापैकी एक / दोन हेक्टर क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार वन संवर्धन कायद्याअंतर्गत वळतीकरण प्रस्ताव मंजूर करवून त्यातच वरील कामे करण्यात यावी. इतर वन क्षेत्रात शक्यतो ग्रीन कव्हर घेण्यात यावे.

14. बांधकामे करतांना ती पर्यावरण पुरक असावित. बांधकाम साहित्य वापरतांना पर्यावरण पुरक व स्थानिक साहित्य वापरावे.

**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ**
**नागपूर**